आजचा शुभ विचार

"नशिबावर विश्वास ठेवण्यापेक्षा स्वत:च्या ताकदीवर विश्वास ठेवा."आपण जे करतोय किंवा आपल्यात जी ताकद आहे ती ओळखायला शिका. नशिबावर निर्भर राहू नका.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर



RNI NO. - MAHMAR/2023/87923

SWARAJYADOOT

# स्वराज्यदूत

www.swarajyadoot.com पहारेकरी सत्याचा.. कैवारी बहुजनांचा..!



चला तर आपल्या सेवेत आम्ही आहोत

जेव्हा गरज असेल प्रसिद्धीची किंवा आपल्या व्यवसायाला चालना देण्याची

दैनिक स्वराज्यदूत

आपल्या पाठीशी आहे

आम्ही देत आहोत आपल्याला जलद गतीने प्रसिद्धीसाठी

छापील वृत्तपत्र आणि इ पेपर मध्ये जाहिरातीचा पर्याय

* फक्त २९९९ रुपयात ३० दिवस आपली कोणतीही जाहिरात प्रसिद्ध केली जाईल. संपर्क -मो. ८४४६६ ७३६७७

स्वराज्यदूत NEWS MEDIA CHANNEL

वेबसाईट ला भेट द्या www.swarajyadoot.com



मुख्य संपादक - श्री. भास्कर जी. देवरे | उपसंपादक - श्री. शांताराम देवरे | कार्यकारी संपादक- श्री. मनोहर देवरे | निवासी संपादक- श्री.संतोष बी.मोहिते

DAILY ▪ MARATHI ▪ YEAR- 3 ▪ ISSUE-54 ▪ Published from NASHIK (MAH) ▪ Monday 30 June 2025 ▪ PAGES 4 ▪ Price - 4 Rs.

दैनिक ▪ मराठी ▪ वर्ष ३ ▪ अंक ५४ ▪ नाशिक ( महाराष्ट्र ) येथून प्रकाशित ▪ सोमवार, दि. ३० जुन २०२५ ▪ पाने ४ ▪ ₹ ४ रुपये


## इ-ट्रॅक्टर शेतकऱ्यांच्या जीवनात क्रांती घडवून आणेल, महाराष्ट्राचे परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांचा दावा

### ठाणे प्रादेशिक परिवहन कार्यालयात पार पडला पहिल्या इ ट्रॅक्टर चा नोंदणी सोहळा

ओम सोमवंशी
मुंबई प्रतिनिधी
दैनिक स्वराज्यदूत

------------------------



पर्यावरण पूरक व पैशाची बचत करणारा इ-ट्रॅक्टर कृषी क्षेत्रात क्रांती घडवून आणेल, असे प्रतिपादन परिवहन मंत्री श्री. प्रताप सरनाईक यांनी केले. ते ठाणे प्रादेशिक परिवहन कार्यालयात देशातील पहिल्या इ-ट्रॅक्टरची नोंदणी करताना बोलत होते. यावेळी ठाणे प्रादेशिक परिवहन अधिकारी हेमांगिणी पाटील, इ-ट्रॅक्टर निर्मिती करणाऱ्या ॲटोनेक्स कंपनी चे मुख्य कार्यकारी अधिकारी कौस्तुभ धोंडे व सेल्स मॅनेजर अभिषेक शिंदे हे उपस्थित होते.मंत्री सरनाईक म्हणाले की, सन.२०३० पर्यंत रस्त्यावरील एकूण वाहनांच्या संख्येमध्ये २० ते ३० टक्के वाहने ही विजेवर चालणारी असावीत, असे शासनाचे धोरण आहे. त्या अनुषंगाने इ-वाहनांना टोल माफी व खरेदीवर थेट अनुदान देण्याची योजना शासनाने आखली आहे.

याचा फायदा इ-ट्रॅक्टर खरेदी करणाऱ्या शेतकऱ्यांना होणार आहे .तसेच स्वर्गीय अण्णासाहेब पाटील आर्थिक विकास महामंडळाच्या माध्यमातून बिनव्याजी कर्ज देखील इ-ट्रॅक्टर खरेदी साठी त्यांना उपलब्ध होऊ शकते. या बरोबरच इतर डिझेल ट्रॅक्टरच्या तुलनेमध्ये इ-ट्रॅक्टरचा देखभाल आणि दुरुस्तीचा खर्च जवळ जवळ शून्य आहे.

तसेच वापर करताना लागणाऱ्या वीजेचा खर्च डिझेल इंधनाच्या तुलनेत ६० ते ७० टक्के ने कमी होणार आहे. त्यामुळे भविष्यात इ-ट्रॅक्टर शेतकऱ्यांचा " किमयागार " ठरणार आहे.नवीकरणीय तंत्रज्ञानावर आधारित ऑटोनेक्स्ट या कंपनीने भारतातील पहिला स्वदेशी निर्मित इ - ट्रॅक्टर यशस्वीपणे बाजारात आणला आहे. आज या ट्रॅक्टरचे पहिले अधिकृत वाहन नोंदणी सोहळा ठाणे येथील प्रादेशिक परिवहन कार्यालयात (RTO) पार पडला.

ऑटोनेक्स्ट कंपनीचा इ- ट्रॅक्टर खरेदीवर महाराष्ट्र राज्य इलेक्ट्रिक वाहन धोरण २०२५ अंतर्गत १.५ लाख रुपयांपर्यंतच्या अनुदान मिळणार आहे. इ-ट्रॅक्टर हा प्रामुख्याने शेतीतील कामासाठी वापरला जाणार आहे.१ एकर नांगरणी करण्यासाठी इ-ट्रॅक्टरला केवळ ३०० रुपये खर्च येतो. या उलट डिझेल ट्रॅक्टर ला हाच खर्च १२०० ते १५०० रुपयांपर्यंत जातो. त्यामुळे दुरुस्तीने देखभाल खर्चातील बचती बरोबरच दैनंदिन वापरामध्ये देखील इ-ट्रॅक्टर शेतकऱ्यांची पैशाची मोठी बचत करू शकतो.


महाराष्ट्रातील अग्रगण्य दैनिक स्वराज्यदूत वृत्तपत्रातर्फे राज्यस्तरीय पुरस्कारासाठी प्रस्ताव पाठविण्याचे आवाहन !

स्वराज्यदूत गौरव पुरस्कार

कर्तृत्वाचा सन्मान... स्वराज्याचा मान !!

महाराष्ट्रातील सामाजिक, शैक्षणिक, सांस्कृतिक, कृषी, सहकार, उद्योग, वैद्यकीय, पत्रकारिता (वृत्तपत्र, इलेक्ट्रॉनिक / डिजीटल मीडिया), युवक, महिला, कला, साहित्य, क्रीडा, पर्यावरण, ग्रामविकास अशा विविध क्षेत्रांमध्ये उल्लेखनिय कार्य करणाऱ्या संस्था व मान्यवर व्यक्तींच्या कार्याचा विशेष सन्मान करून भावी वाटचालीस तसेच उल्लेखनिय कार्य करण्यासाठी प्रेरणा मिळावी म्हणून दैनिक स्वराज्यदूतने हा पुरस्कार आयोजित केलेला आहे.

कौतुक तुमच्या कार्याचे

दैनिक स्वराज्यदूत SWARAJYADOOT LIVE

दैनिक वृत्तपत्र वृत्त वाहिनी

ऑगस्ट महिन्यात नाशिक येथे अतिशय भव्य-दिव्य समारंभात पुरस्कार वितरण नियोजित

प्रस्ताव पाठविण्यासंदर्भात सूचना

- संपूर्ण प्रस्ताव pdf स्वरुपात संगणकावर तयार केलेल्या स्वरुपात दि. ३१ जुलै २०२५ पर्यंत dainikswarajyadoot@gmail.com या इ-मेल वर पाठवायचा आहे.
- फक्त निवड झालेल्या व्यक्तींना प्रस्तावाची प्रिंट स्वरुपात (Hard copy) जमा करावी लागेल.
- प्रस्ताव पूर्णपणे मोफत स्वीकारले जातील. कोणताही आर्थिक मोबदला देण्याचा प्रयत्न करू नये. पुरस्कारासाठी कुणाशीही आर्थिक व्यवहार करू नये.
- दैनिक स्वराज्यदूत परिवाराशी संबंधित व्यक्ती, प्रतिनिधी यांना प्रस्ताव पाठवता येणार नाहीत.
- जिल्हा परिषद कर्मचारी, राज्य व केंद्र सरकारचे कर्मचारी यांचे प्रस्ताव स्वीकारले जाणार नाही.

अधिक माहितीसाठी खालील नंबर वर संपर्क करावा.
8446673677 / 8010232449


## रशियाचा युक्रेनवर सर्वात मोठा हवाई हल्ला, एफ-16 लढाऊ विमानाचा पायलट ठार

विशेष वृत्त सेवा
दैनिक स्वराज्यदूत

------------------------



युक्रेनच्या हवाई हद्दीवर रशियाचा हा आतापर्यंतचा सर्वात मोठा हवाई हल्ला आहे. युक्रेनचे अध्यक्ष झेलेन्स्की यांनी म्हटले आहे की, या हल्ल्यात एफ-१६ लढाऊ विमानाचा पायलट मृत्युमुखी पडला आहे. काही दिवसांपूर्वीच नाटो शिखर परिषद संपल्यानंतर रशियाने हा हल्ला केला आहे. या शिखर परिषदेत जगातील सामर्थ्यवान राष्ट्रप्रमुखांनी ३ वर्षांपासून सुरू असलेले हे रशिया युक्रेन युद्ध लवकर संपवण्याचे आवाहन केले होते.

तीन वर्षांपूर्वी सुरू झालेल्या रशिया-युक्रेन युद्धात रशियाने केलेला हा सर्वात मोठा हवाई हल्ला आहे. या हल्ल्यात युक्रेनच्या एफ-१६ लढाऊ विमानाचा पायलट मृत्युमुखी पडला आहे. युक्रेनचे अध्यक्ष झेलेन्स्की यांनी म्हटले आहे की रशियाने रात्रभर ५३७ शस्त्रांसह युक्रेनवर हवाई हल्ला केला आहे. त्यात ४७७ ड्रोन आणि ६० क्षेपणास्त्रे होती. या हल्ल्याची माहिती देताना अध्यक्ष झेलेन्स्की म्हणाले की, या हल्ल्यातील दुःखद भाग म्हणजे रशियन हल्ल्याला निष्क्रिय करण्यात गुंतलेले एफ-१६ विमानाचे पायलट मॅक्सिम उस्टेन्को रशियन हल्ल्याच्या तावडीत सापडले आणि त्यांचा मृत्यू झाला.

झेलेन्स्की पुढे म्हणाले की, "या एफ-१६ च्या पायलटनी शत्रूची ७ हवाई लक्ष्ये नष्ट केली आहेत. त्यांच्या कुटुंबियांना आणि सहकाऱ्यांना माझी संवेदना. त्यांच्या मृत्यूच्या सर्व परिस्थितीची चौकशी करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत." झेलेन्स्की यांच्या मते, रशियाने ज्या ड्रोनने हल्ला केला त्यापैकी बहुतेक ड्रोन इराणमध्ये बनवले गेले होते. ते पुढे म्हणाले की, स्मिला येथील एक निवासी इमारत देखील या रशियन सैन्याच्या हल्ल्यांत लक्ष्य बनली आहे. ज्यामध्ये एक लहान मूल जखमी झाले.

रशियावर टीका करताना युक्रेनचे अध्यक्ष झेलेन्स्की यांनी म्हटले की, 'मोस्कोकडे मोठे हल्ले करण्याची क्षमता आहे तोपर्यंत ते थांबणार नाही.' या आठवड्यातच ११४ हून अधिक क्षेपणास्त्रे, १,२७० हून अधिक ड्रोन आणि सुमारे १,१०० ग्लाइड बॉम्ब डागण्यात आले आहेत. जगाच्या शांततेच्या आवाहनाला न जुमानता पुतिन यांनी युद्ध सुरू ठेवण्याचा निर्णय खूप आधीच घेतला होता. जे आता थांबवले पाहिजे." असे देखील झेलेन्स्की यांनी आपले मत मांडले. त्यासाठी त्यांनी जगातील देशांना पुतिनवर अधिक दबाव आणण्याचे आवाहन केले. युक्रेनियन हवाई दलाने सांगितले की त्यांनी रशियाचे २४९ ड्रोन हल्ले अडवले आणि निष्क्रिय करण्यास मदत केली. ज्यामधील २२६ आकाशात नष्ट केली. एपीनुसार, हे ड्रोन इलेक्ट्रॉनिक पद्धतीने जाम झाले आहेत. युक्रेनने हे ड्रोन अडवल्याचा दावा केला असेल, परंतु यामुळे युक्रेनच्या नागरी पायाभूत सुविधांचे मोठे नुकसान झाले आहे.

युक्रेनच्या हवाई दलाचे संपर्क प्रमुख युरी इहनाट म्हणाले की, रशियाने रात्री केलेला हा हल्ला देशावरील "सर्वात मोठा हवाई हल्ला" होता, ज्यामध्ये ड्रोन आणि विविध प्रकारच्या क्षेपणास्त्रांचा समावेश होता. या हल्ल्यात युक्रेनच्या पश्चिमेकडील भागांसह संपूर्ण प्रदेशाला लक्ष्य करण्यात आले, जे आघाडीच्या रेषेपासून दूर होते.

युक्रेनच्या संरक्षण मंत्रालयाने सांगितले की रशियाने डागलेल्या शस्त्रांमध्ये २११ इराणी शाहेद ड्रोन होते. तर काही इतर युएव्ही होते. युक्रेनियन सैन्याने २२५ शस्त्रे इलेक्ट्रॉनिक पद्धतीने जॅम करून नष्ट केली. याव्यतिरिक्त, रशियाने १ इस्कंदर बॅलिस्टिक क्षेपणास्त्राने हल्ला केला. युक्रेनने ३३ इस्कंदर क्रूझ क्षेपणास्त्रे पाडली. याशिवाय ४ कालिबर क्रूझ क्षेपणास्त्रांवरही हल्ला करण्यात आला.

## आई एकविरा मंदिरात भाविकांना सात जुलैपासून ड्रेस कोड, तोडके कपडे घालून आल्यास मंदिरात प्रवेश मिळणार नाही

सुनील बाचरे
अंबरनाथ प्रतीनिधी
दैनिक स्वराज्यदूत

----------------------




कोळी बांधवांची आराध्य दैवत असलेल्या आई एकविरा मंदिरात भाविकांना ड्रेस कोड बंधनकारक करण्यात आला आहे. त्यासंदर्भात आई एकवीरा देवीच्या संस्थानकडून पत्रक काढण्यात आले असून त्याची अंमलबजावणी भाविकांना ७ जुलै पासून करावी असे आवाहन करण्यात आले. स्थानिक दुकानदारांना आणि भाविकांना हा नियम लागू असणार आहे. मंदिराचं पावित्र राखण्यासाठी संस्थाकडून निर्णय घेण्यात आला आहे. तसेच तोडके आणि अंग प्रदर्शन करणारे कपडे घालून आल्यास भाविकांना प्रवेश नाकारण्यात येईल अशी माहिती संस्थांकडून देण्यात आली.

तसेच परिपत्रकात उल्लेख केल्याप्रमाणे महिला, तरुणी, पुरुष, युवक यांनी कपडे परिधान करावेत. महिलांना मंदिरात प्रवेश करायचा असल्यास त्यांनी साडी, सलवार, कुर्ता, किंवा इतर भारतीय कपडे प्रधान करावेत. महिला आणि तरुणींनी पूर्ण अंग झाकलेले असावेत. तरुण युवक वर्ग आणि पुरुष यांच्यासाठी धोतर, पायजमा, कुर्ता, पॅन्ट, टी-शर्ट, शर्ट, किंवा इतर भारतीय कपडे परिधान केलेले असावेत. असा उल्लेख पत्रकात करण्यात आला आहे.

तरुण आणि तरुणींनी शॉर्टस, शॉर्ट स्कर्ट, वेस्टन कपडे, मिनी स्कर्ट, फाटलेली जीन्स, हाफ पॅन्ट किंवा अंग प्रदर्शन करणारे कपडे घालू नयेत. अशी कपडे कुणी परिधान करून आढळल्यास त्या भक्ताला मंदिरात प्रवेश दिला जाणार नाही. ड्रेस कोड हा बंधनकारक आहे. अशी माहिती आई एकविरा देवीच्या संस्थानकडून देण्यात आली. त्यामुळे परिपत्रकानुसार भाविकांनी नियम पाळावेत असे आवाहन देखील संस्थांकडून करण्यात आले आहे.


अल्पावधीत संपूर्ण महाराष्ट्रात लोकप्रिय झालेल्या

दैनिक स्वराज्यदूत

या वृत्त पत्रामध्ये वार्ताहर , जाहिरात प्रतिनिधी , गाव, तालुका तसेच जिल्हा पातळीवर काम करण्याची सुवर्ण संधी

आजच संपर्क करा ८४४६६७३६७७

संपादकीय

# जिल्हा परिषद शाळांना संजीवनी कोण देणार?

राज्यात मराठी भाषेला तिसरा पर्याय म्हणून पहिलीपासून हिंदीची सक्ती यावरून राजकीय वातावरण ढवळून निघाले आहे. स्थानिक स्वराज्य संस्थांच्या येऊ घातलेल्या निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर विरोधकांनी नव्याने कात टाकल्याप्रमाणे आक्रमक पवित्रा घेतला आहे. सत्ताधाऱ्यांनीदेखील काही प्रमाणात 'बॅकफूट'ला जात सर्वसमावेशक चर्चा करून यावर निर्णय घेण्याचे जाहीर केले. मुळातच मराठी भाषेचा पुळका घेऊन राणा भीमदेवी थाटात उतरलेल्या राजकीय नेतेमंडळींचे मराठी भाषा, मराठी शाळांवरील प्रेम हे पुतना मावशीचे प्रेम असल्याचे मागील काही वर्षांमध्ये स्पष्ट झाले आहे. स्वत:ची मुले इंग्रजी माध्यम, सीबीएसई बोर्ड, दिल्ली बोर्ड, इंटरनॅशनल बोर्ड, कॉन्व्हेंट शाळा अशा विविध इंग्रजाळलेल्या शाळांमध्ये घालायची आणि राजकीय व्यासपीठावरून मराठीच्या नावाने टाहो फोडत मराठी भाषिकांची मते मिळवायचा 'फंडा' गेल्या काही वर्षांपासून महाराष्ट्राच्या राजकारणात सुरू आहे. मुंबई शहर, उपनगरात तसेच कल्याण-डोंबिवली, नवी मुंबई, पालघर, पनवेल-उरण, बदलापूर, कर्जत-कसाऱ्यापर्यंत मराठी भाषेच्या शाळा गेल्या काही वर्षांमध्ये मोठ्या प्रमाणावर बंद पडल्या असून त्या त्या शाळेतील शिक्षकांना 'सरप्लस' व्हावे लागल्याने त्यांना अन्य शाळांची शोधाशोध करण्याची वेळ आली आहे. नोकरी टिकविण्यासाठी सभोवतालच्या परिसरात जाऊन तेथील मुले आपल्या शाळांमध्ये आणण्यासाठी विविध प्रकारचे द्राविडी प्राणायम करावे लागत आहेत.

इंग्रजी माध्यमांच्या शाळांचा मोठ्या प्रमाणावर ग्रामीण भागात शिरकाव होऊ लागल्याने राज्यातील अनेक जिल्ह्यांमध्ये कार्यरत असलेल्या अधिकाधिक जिल्हा परिषदेच्या शाळांमध्ये विद्यार्थी संख्या घटल्याने तेथील शाळांनाही टाळे लावण्याची वेळ आज निर्माण झाली आहे. जिल्हा परिषद शाळांमध्ये गेल्या काही वर्षांपासून सातत्याने विद्यार्थ्यांची संख्या घटत असून यंदाही ही घसरण कायम राहिली आहे. गेल्या काही वर्षांमध्ये त्या त्या ग्रामीण भागातील पालकांनी जिल्हा परिषदांच्या शाळांमध्ये मुलांना प्रवेश न देता इंग्रजी माध्यमांच्या शाळांमध्ये प्रवेश देण्यास प्राधान्य दिल्याने अनेक जिल्ह्यांमध्ये हजारोंच्या संख्येने विद्यार्थ्यांनी जिल्हा परिषदेच्या शाळांकडे पाठ फिरवली आहे. ग्रामीण भागातील जिल्हा परिषद शाळांच्या शिक्षणावर हे संकट गडद होत असताना शिक्षण विभाग आणि तेथील स्थानिक लोकप्रतिनिधी उदासीन असल्याचे चित्र आहे. विद्यार्थ्यांची कमी होणारी पटसंख्या शिक्षण विभागाच्या कार्यक्षमतेवर प्रश्नचिन्ह निर्माण करणारी बाब आहे. जिल्हा परिषदेच्या शाळांमध्ये शिक्षण मोफत असूनही पालक खासगी शाळांमध्ये लाखो रुपये खर्च करून शिक्षणाची निवड करत आहेत, यावरून पालकांचा सरकारी शिक्षण व्यवस्थेवरील विश्वास ढासळत असल्याचे स्पष्टपणे पाहावयास मिळत आहे. शासन समग्र शिक्षण अभियान, शाळा दत्तक योजना, डिजिटल क्लासरूम अशा योजना जाहीर करते व राबविते. मात्र त्यांची प्रभावीपणे अंमलबजावणी होते का, हाही प्रश्न आहे. पटसंख्या कमी होण्याचे प्रमाण येत्या काळात असेच कायम राहिले तर राज्यातील जिल्हा परिषदेच्या शाळांच्या अस्तित्वावरही प्रश्नचिन्ह निर्माण होणार आहे. जिल्हा परिषदेच्या शाळांमध्ये पटसंख्येची होणारी ही घसरण आताच थांबविली नाही तर, भविष्यात ग्रामीण भागातील शिक्षणाची आणखी अधोगती होणार, हे निश्चित आहे.

जिल्हा परिषदेच्या शाळांमध्ये समग्र शिक्षा अभियान, शाळा समृद्धी योजना, डिजिटल क्लासरूम यांसारख्या योजनांची अंमलबजावणी नेमकी कुठे कमी पडते, याची पडताळणी होणे गरजेचे आहे. मोफत पुस्तके, गणवेश, पोषण आहार यावर कोट्यवधी रुपये खर्च करूनही जिल्हा परिषदेच्या शाळांमधील पटसंख्येत होणारी घट, ही गंभीर बाब आहे. जिल्हा परिषदांच्या शाळांमध्ये इंग्रजी माध्यमाच्या, सेमी इंग्रजी माध्यमांच्या अथवा सीबीएसई बोर्डाचे अभ्यासक्रम वेळीच सुरू केले असते तर ग्रामीण भागात महागडे शिक्षण देणाऱ्या इंग्रजी शाळांच्या संस्थांना शिरकाव करणेही अवघड झाले असते. जिल्हा परिषदेच्या शाळा टिकविण्यासाठी त्या त्या काळांतील राज्य सरकारच्या शिक्षण मंत्र्यांनी, शिक्षण विभागाने आजतागायत कधीही गांभीर्याने प्रयत्न केलेच नाहीत. शाळांमध्ये पटसंख्या कायम राहावी किंवा वाढावी यासाठी शिक्षण विभाग व शिक्षकांकडून अपुरे प्रयत्न झाल्याने गावागावातील मुलांचा खासगी शाळांकडे वाढता कल गेल्या काही वर्षांमध्ये राहिला आहे. परिणामी तेथील इंग्रजी माध्यम व सुविधा यामुळे अनेक पालक मुलांना खासगी शाळांमध्ये गेल्या काही वर्षांमध्ये पाठवू लागले आहेत. काही जिल्हा परिषद शाळांमध्ये शिक्षकांची अनुपलब्धता, साधनसामग्रीची कमतरता हेही कारण आहे. जिल्हा परिषदांच्या शाळांना टाळे लागत आल्याने टाहो फोडण्यात आता काहीही अर्थ राहिलेला नाही. स्पर्धेमध्ये उतरण्यासाठी अथवा जिल्हा परिषद शाळांचे अस्तित्व टिकविण्यासाठी आता वरवरची मलमपट्टी नाही तर ठोस उपाययोजनांची गरज आहे. शहरी भागातील मराठी भाषा टिकविण्यासाठी आपल्याला आलेल्या अपयशाचा कलंक पुसून काढण्यासाठी जिल्हा परिषदेच्या शाळा टिकविणे आवश्यक आहे. अनेक गावांमधील जिल्हा परिषदेच्या शाळांना टाळे लागले आहे. हे चित्र सर्व राज्यामध्ये दिसण्यापूर्वीच राज्य सरकारच्या शिक्षण विभागाने तसेच सत्ताधाऱ्यांनी, विरोधकांनीही एकत्रित येत प्रयत्न करणे आवश्यक आहे.

हिंदी भाषेला पर्यायी भाषेचा दर्जा देण्याचा प्रयत्न करताच राज्यातील राजकीय वातावरण ढवळून निघाले; परंतु राज्याच्या ग्रामीण भागातील जिल्हा परिषदेच्या शाळांना लागत असलेले टाळे व त्या शाळांमधील शिक्षकांवर 'सरप्लस'च्या नावाखाली येऊ घातलेली बेरोजगारीची वेळ याकडे पाहण्यास कोणालाही वेळ नाही. जिल्हा परिषदेच्या शाळांचे अस्तित्व न टिकल्यास गोरगरिबांच्या, शेतमजुरांच्या मुलांना आर्थिक गणितांची जुळवाजुळव न झाल्यास शिक्षणापासून वंचित राहण्याची वेळ येणार आहे. सर्वांनाच इंग्रजी माध्यमाच्या शाळांतील महागडे शिक्षण परवडणारे नाही. जिल्हा परिषदेच्या शाळा टिकविण्यासाठी ग्रामपंचायत सदस्य, सरपंच, पंचायत समिती, जिल्हा परिषद सदस्यांनी एकत्रित येणे व गावागावातील ग्रामस्थांमध्ये जनजागृती करणे आवश्यक आहे; परंतु दुसरीकडे जिल्हा परिषदेच्या शाळांतील शैक्षणिक दर्जा उंचावण्यासाठीही प्रयत्न झाले पाहिजेत. म्हातारी मेल्याचे दु:ख नाही, पण काळ सोकावता कामा नये. या उक्तीप्रमाणे शहरी भागासाठी आपण काही करू शकलो नाही, निदान ग्रामीण भागातील जिल्हा परिषदेच्या माध्यमातून चालविल्या जाणाऱ्या मराठी शाळांच्या अस्तित्वासाठी संघटित होणे काळाची गरज आहे.

# वीज दर स्वस्त नसुन शॉक आहे

राज्यातील वीज ग्राहकांसाठी वीज दर ठरविण्यासाठी महावितरणने दाखल केलेल्या याचिकेवर महाराष्ट्र नियामक आयोगाने निर्णय दिला असून घरगुती-औद्योगिक अशा सर्व ग्राहकांच्या वीजदरात आगामी पाचही वर्षात कपात करण्याचा आदेश दिला आहे.स्मार्ट मीटर असलेल्या घरगुती ग्राहकांना दिवसा वीज वापरासाठी १० टक्के अतिरिक्त टीओडी सवलत आणि सौर ऊर्जा निर्मिती करणाऱ्या घरगुती ग्राहकांना प्रोत्साहन याचे स्वागतच.गरीब व सर्वसामान्य ग्राहक घरगुती युनिटचा वापर साधारणतः १०० ते ३०० युनिट पर्यंत होतोच आणि सरकारने ग्राहकांना फक्त १ ते १०० युनिट पर्यंत ५.७४ प्रति युनिट असा दिलासा दिला आहे हे तर असे झाले की "उंट के मु मे जीरा" त्यामुळे वीज ग्राहकांना दिलासा किंवा स्वस्त म्हणता येणार नसुन याला जोर का झटका म्हणावा लागेल. आज राज्यात १०० युनिटपेक्षा कमी वीज वापरणाऱ्यांचे ७० टक्के सांगितले जात आहे.परंतु माझ्या माहितीनुसार १०० युनिटपेक्षा कमी वीज वापरणाऱ्यांचे प्रमाण साधारणतः ३० टक्के पेक्षा कमी असावेत आणि शंभरच्या वर म्हणजे १०० ते ३०० युनिट पर्यंत वापरणाऱ्यांचे प्रमाण ५० टक्के पेक्षा जास्त असावेत कारण यात गरीब व सर्वसाधारण किंवा कामगार वर्ग मोडतो.त्यामुळे महाराष्ट्र विद्युत नियामक आयोगाने वीजेचे जे युनिट दर आणि युनिटची आकडेवारी दिली आहे त्यात बदल करणे गरजेचे आहे.विद्युत नियामक आयोगाने जे १ ते १०० पर्यंत युनिटचे दर ५.७४ लावले आहेत ते दर १ ते ३०० युनिट पर्यंत लावायला पाहिजे होते तेव्हा ग्राहकांना दिलासा मिळेल. कारण साधारणतः १०० युनिटच्या वर सर्वांचाच वापर होतो. करीता वीज दरात ग्राहकांना सरसकट दिलासा हा दिखावा असुन महावितरणने व महाराष्ट्र विद्युत नियामक आयोगाने दिलेला मोठा शॉक आहे. महाराष्ट्र राज्य विद्युत निर्मितीच्या बाबतीत अव्वल आहे. परंतु इतर राज्यांच्या बरोबरीचा विचार केला तर वीज दर इतर राज्यांच्या तुलनेत महाराष्ट्रांतील दर जास्त व महागडे आहे ही वीज निर्मिती करणाऱ्या राज्याच्या दृष्टीकोनातून चिंताजनक बाब म्हणावी लागेल.त्यामुळे महाराष्ट्र विद्युत नियामक आयोगाने आखुण दिलेले वीज दर सर्वसामान्यांना परवडणारे नसल्याने यात बदल करून १ ते ३०० पर्यंत युनिट वीज वापरणाऱ्या ग्राहकांना ५.७४ प्रति युनिट दर लावावा जेणेकरून याचा फायदा गरीब व सर्वसामान्यांना सहज होईल.कारण वाढती महागाई, वीजेचे बिल, घर टॅक्स, पाणी बील, औषधोपचाराचा खर्च इत्यादी अनेक बाबी अल्पशा उत्पन्नात पुर्ण होवू शकत नाही त्यामुळे आपली स्वतःची वीज निर्मिती असल्याने यात गरीब व सर्वसामान्यांना कशा पद्धतीने लाभ देता येईल यावर सरकारने,महावितरणने व महाराष्ट्र विद्युत नियामक आयोगाने गांभीर्याने विचार करावा व ग्राहकांना दिलासा द्यावा हीच अपेक्षा.

------------------------------------

लेखक
रमेश कृष्णराव लांजेवार
नागपूर

# स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीसाठी तयारी लागा जिल्हाध्यक्ष सुरेश सोनवणे

## चार जुलै रोजी प्रदेशाध्यक्ष खा सुनिल तटकरे यांच्या धुळे जिल्हा दौरा

श्री संजय बच्छाव
धुळे जिल्हा प्रतिनिधी
दैनिक स्वराज्यदूत



येत्या चार जुलै रोजी स्थानिक स्वराज्याचा निवडणुकीसाठी राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी चे प्रदेशाध्यक्ष खासदार सुनिल तटकरे हे धुळे जिल्हा दौऱ्यावर येत आहे धुळे जिल्हा पदाधिकारी व कार्यकर्त्यांचा मेळावा आयोजन करण्यात आले आहे..तरी धुळे जिल्ह्यातील व साक्री तालुक्यातील जास्तीत जास्त पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी उपस्थितीत रहावे असे आवाहन राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी धुळे जिल्हा ग्रामीण चे जिल्हाध्यक्ष सुरेश सोनवणे यांनी केले आहे.कासारे येथे शनिवारी राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी साकी तालुका च्या पदाधिकारी ची आढावा बैठक घेण्यात आली या बैठकीला अध्यक्ष म्हणून जिल्हाध्यक्ष सुरेश सोनवणे हे होते यावेळी युवक जिल्हाध्यक्ष सुमित पवार.अल्पसंखाक विभागाचे राष्ट्रीय सरचिटणीस ताहीर बेग मिर्झा महिला आघाडी जिल्हाध्यक्ष संजिवनी ताई गांगुर्डे.युवती जिल्हाध्यक्ष अँड रेखा सुर्यवंशी.सामाजिक न्यायचे जिल्हाध्यक्ष भैय्या साळवे.जिल्हा उपाध्यक्ष राजेश बागुल.जिल्हा परिषद सदस्य डॉ नितीन सुर्यवंशी.विज अहिरे.प स सदस्य दिलीप देसले. निलेश राणे . माधवराव पाटील.प्रकाश शिरसाठ.करीम शाह.मनिष देसले. तालुका अध्यक्ष विलास देसले सर ज्ञानेश्वर देसले.रावसाहेब साळुंके.राहुल चव्हाण.किशोर अहिरराव.अतुल देवरे.अनिल तोरवणे.विजय सोनवणे.वैभव सोनार.किरण देवरे.सुनिल बेडसे मोठया संख्येने पदाधिकारी उपस्थितीत होते यावेळी जिल्हा युवक उपाध्यक्ष मनिष देसले यांची निवड झाल्याबद्दल त्यांचे जाहीर सत्कार करण्यात आला. स्थानिक स्वराज्याचा धुळे जिल्ह्यात निवडणूक होत आहे यात धुळे महानगरपालिका.धुळे जिल्हा परिषद साकी पंचायत समिती धुळे प स शिंदखेडा प स शिरपूर प स नगर पालिका.दोडाईचा नगरपालिका.शिदखेडा नगर पंचायत व पिंपळनेर नगर पंचायती चा निवडणुकीसाठी तयारी लागा असे आवाहन राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी जिल्हाध्यक्ष सुरेश सोनवणे यांनी केले आहे सर्व समाजाला सोबत घेऊन काम केले पाहिजे कोणावर अन्याय होणार नाही यांची काळजी पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी घ्यावी पक्षाचे जास्तीत जास्त सभासद नोंदणी करा. तसेच शासनाकडून राष्ट्रवादी पदाधिकारी व कार्यकर्त्यांना विशेष कार्यकारी अधिकारी पदावर काम करण्याची संधी मिळणार आहे तरी अध्यक्ष व कार्याध्यक्ष यांनी पदाधिकाऱ्यांची यादी लवकररात लवकर जमा करा असे आवाहन जिल्हाधयक्ष सुरेश सोनवणे यांनी केले आहे यावेळी सुत्रसंचलन विलास देसले सर यांनी केले आभार जिल्हा युवक उपाध्यक्ष मनिष देसले यांनी व्यक्त केले

# साने गुरूजी प्राथमिक विद्यामंदिर शाळा प्रवेशोत्सव साजरा

श्री संजय बच्छाव
धुळे जिल्हा प्रतिनिधी
दैनिक स्वराज्यदूत

------------------------------



नवीन शैक्षणिक वर्षाच्या पहिल्या दिवशी नवगतांचं स्वागत आणि विद्यार्थ्यांच्या स्वागतासाठी शाळेने सुंदर असा विद्यार्थ्यांचा उत्साह वाढावा व त्यांची शैक्षणिक उपस्थिती वाढवावी या दृष्टीने साने गुरुजी प्राथमिक विद्यामंदिर सामोडे येथे स्वागताचा व मोफत पाठ्यपुस्तक वाटपाचा उत्कृष्ट असा कार्यक्रम संस्थेचे सचिव माननीय आप्पासाहेब विनायक सिताराम देवरे यांच्या अध्यक्षतेखाली आयोजित करण्यात आला. पहिल्या दिवशी शाळेत येताना आनंद वाटावा शाळेबद्दल गोडी वाढवी यासाठी मुलांचे स्वागत व औक्षण करून विविध सजावटींनी पुष्पगुच्छ यांनी मुलांचे स्वागत आणि सत्कार करण्यात आला याप्रसंगी पालकांसोबत संस्थेचे अध्यक्ष दादासाहेब हंसराज शिंदे संस्थेचे सचिव माननीय शरद शिंदे साक्री तालुका शेतकरी संघाचे संचालक व सावित्रीबाई फुले संघाचे संचालक आणि जयदया शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष माननीय काकासाहेब अनिल शिंदे, प्रतिष्ठित नागरिक श्री. प्रदीप घरटे, श्री.भटू भारूड ,सौ.आशा शिंदे, सौ ताईसाहेब वाघ यांसोबत पालक वर्ग ही उपस्थित होता. कार्यक्रमात विद्यार्थ्यांना पाठ्यपुस्तकाचे मोफत वाटप करण्यात आले. शाळेच्या प्रथम दिवशी गोड अशा खाऊचे वाटप करण्यात आले.विद्यार्थ्यांसोबत विविध खेळ खेळून त्यांचे मनोरंजन करण्यात आले. याप्रसंगी साने गुरुजी प्राथमिक विद्या मंदिराच्या मुख्याध्यापिका कविता भदाणे, श्रीम. मनिषा भदाणे,श्री. ज्ञानेश्वर घरटे, श्री. कुणाल बेनुस्कर यांनी कार्यक्रमाचे सूत्रसंचालन केले. मुख्यमंत्री कार्य प्रशिक्षणार्थी सौ.कविता शिंदे व सौ.माधुरी घरटे यांनी कार्यक्रम यशस्वीतेसाठी सहकार्य केले

# फाईल पूर्ण झाली नाही, तर घरकुलाचा पैसाही नाही! - सीईओ मेघना कावली

मनोज बिरादार
नांदेड जिल्हा प्रतिनिधी
दैनिक स्वराज्यदुत

-----------------------------



मुखेड तालुक्यातील घरकुल योजनेंत 'काहीही चालतं' हे दिवस आता संपलेत! लाभार्थ्यांची फाईल पूर्ण झाल्याशिवाय त्यांच्या खात्यात एक रुपयाही टाकू नका, असा थेट आदेश जिल्हा परिषद मुख्य कार्यकारी अधिकारी मेघना कावली यांनी अधिकाऱ्यांना दिला. गुरुवारी पंचायत समितीमध्ये झालेल्या आढावा बैठकीत त्यांनी घरकुल योजनेच्या संदर्भात अधिकार्यांची चांगलीच झाडाझडती घेतली. गावपातळीवर जाऊन लाभार्थ्यांच्या फाईली तयार करा, जिओ टॅगिंग प्रत्यक्ष जागेवर जाऊन करा, असे निर्देश देताना कामचुकार कर्मचाऱ्यांना खबरदारीचा इशाराही दिला.

कंत्राटी कर्मचाऱ्यांच्या भरवश्यावर घरकुल योजना!

या महत्त्वाच्या योजनेत शासकीय कर्मचारीच नाहीत! संपूर्ण कारभार कंत्राटी ऑपरेटरकडे आहे. संगणक बंद, कार्यालयातील काम बंद, मोबाईलवरूनच घरकुल योजना 'पुन्हा पाहा' सुरू आहे. परिणामी सामान्य नागरिकांची फरपट होत आहे. मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांनी या स्थितीकडे गांभीर्याने लक्ष घालावे, अशी जनतेची मागणी आता जोर धरू लागली आहे.

अधिकाऱ्यांची हजेरी

या बैठकीस गटविकास अधिकारी चंद्रशेखर रामोड, सहायक गटविकास अधिकारी शिवाजी ढवळे, गटशिक्षणाधिकारी हमीद दौलताबादी, विस्तार अधिकारी, ग्रामसेवक व सर्व विभागांचे अधिकारी आणि कर्मचारी हजर होते. मात्र, कामाचा हलगर्जीपणा आणि जबाबदारी टाळण्याची वृत्ती काही ठिकाणी अजूनही कायम असल्याचं चित्र उघड झालं.

# जानाटोला पेट्रोल पंपाजवळ शहारे यांच्या शेतात अस्वलाचे दर्शन वनविभाग व पोलिस प्रशासनाचे कर्मचारी तातडीने घटनास्थळी हजर!

देवेंद्र दमाहे
दैनिक स्वराज्यदुत
गोंदिया जिल्हा प्रतिनिधी

---------------------------

गोरेगाव-कोहमारा मार्गावरील जानाटोला येथील पेट्रोल पंपासमोरील भरत दमाहे नावाच्या व्यक्तीच्या शेतात एका झाडावर अस्वल आढळून आल्याने परिसरात एकच खळबळ उडाली. अस्वल झाडावर बसून असल्याचे दृश्य पाहण्यासाठी आजूबाजूच्या गावांतील नागरिक मोठ्या संख्येने घटनास्थळी दाखल झाले.







हायवे लगत मर्यादित क्षेत्रात शेती असल्याने अस्वल सहज दिसून आले. ग्रामस्थांनी तत्काळ गोरेगाव वनविभागाला याबाबत माहिती दिली. घटनेची माहिती मिळताच वनविभागासोबतच पोलीस प्रशासनही तातडीने घटनास्थळी दाखल झाले.

प्रशासनाने ग्रामस्थांना संयम बाळगण्याचे आणि शांतता राखण्याचे आवाहन केले आहे. सध्या वनविभागाच्या पथकाकडून अस्वलाला सुरक्षितरीत्या रेस्क्यू करण्याचे काम सुरू आहे. अस्वल झाडावरच स्थिर असून परिस्थिती नियंत्रणात आहे.

वनविभागाने तसेच पोलिस प्रशासनानी दिलेल्या माहितीनुसार, लवकरच अस्वलाचे रेस्क्यू करण्यात येणार असून नागरिकांनी घाबरून न जाता सहकार्य करावे, असे आवाहन करण्यात आले आहे.

# एका वर्षातच पिपरिया ते गल्लाटोला मुख्य रस्त्याची ऐसी-तैसी!

## कोट्यवधींचा रस्ता खड्ड्यात, नागरिकांचा जीव धोक्यात – अपघातांचे सत्र सुरुच!

### भाजप उपसरपंच गुणाराम मेहर यांची प्रशासनाला चेतावणी – दोषींवर मनुष्यवधाचा गुन्हा दाखल करा!

देवेंद्र दमाहे
गोंदिया जिल्हा प्रतिनिधी
दैनिक स्वराज्यदुत

------------------------

सालेकसा तालुक्यातील अतिदुर्गम, आदिवासी बहुल पिपरिया भागाला मध्यप्रदेश व छत्तीसगडशी जोडणारा गल्लाटोला-पिपरिया मुख्य रस्ता आज अक्षरशः खड्ड्यांच्या तोंडात गेला आहे. अवघ्या एका वर्षापूर्वी मुख्यमंत्री सडक योजनेअंतर्गत सुमारे ४.७५ कोटी रुपये खर्चून बांधलेला हा रस्ता आता मृत्यूच्या दारात पोहोचला आहे.

दररोज अपघातांचे प्रमाण वाढले असून विद्यार्थी, व्यापारी आणि सामान्य नागरिकांचे आयुष्य धोक्यात आले आहे. विशेषतः पावसाळ्याच्या सुरुवातीने रस्त्याची अवस्था आणखी बिकट झाली आहे.

रस्त्याची वेळखाऊ सुरुवात आणि धोकादायक शेवट

जून २०१९ : तत्कालीन आमदार संजय पुराम यांच्या पाठपुराव्याने प्रशासकीय मंजुरी

१० जानेवारी २०२० : आमदार सहषराम कोरोटे यांच्याकडून भूमिपूजन

मार्च २०२३ ते मार्च २०२४ : प्रत्यक्ष काम पूर्ण

जून २०२५ : रस्त्याची पुन्हा दयनीय अवस्था – खड्डे, डांबर उखडणे, पाणी साचणे







विद्यार्थ्यांच्या जिवावर उठलेला रस्ता

शाळा व महाविद्यालय पुन्हा सुरू झाल्याने विद्यार्थ्यांची या रस्त्यावर ये-जा सुरू झाली आहे. मात्र उखडलेल्या रस्त्यांमुळे अपघातांचे प्रमाण वाढले आहे. लोकांमध्ये तीव्र संताप असून, प्रशासनाने कानाडोळा केल्यास मोठे आंदोलन उभे राहण्याची शक्यता आहे.

प्रश्नच प्रश्न... पण उत्तर कोण देणार?

या रस्त्याच्या देखभाल-दुरुस्तीचा ठेका नक्की कोणाकडे आहे? दर्जाबाबत कोणती जबाबदारी निश्चित केली आहे? एवढ्या मोठ्या निधीचा उपयोग नेमका कुठे झाला? अपघातात जर मृत्यू झाला, तर जबाबदार कोण? ग्रामस्थांचा इशारा – आंदोलनाची तयारी!

नागरिकांनी संबंधित अभियंते, उपअभियंते, व कंत्राटदारावर कठोर कारवाई करण्याची मागणी केली आहे.

अन्यथा याच रस्त्यावर तीव्र स्वरूपाचे जनआंदोलन छेडले जाईल, असा इशारा ग्रामस्थ व स्थानिक जनप्रतिनिधींनी दिला आहे.

**दोषींवर "सदोष मनुष्यवधाचा गुन्हा" दाखल करणार!**

"रस्त्याची अवस्था भयंकर आहे. मी लेखी तक्रारी व प्रत्यक्ष संपर्क करूनही संबंधित अधिकाऱ्यांनी दुर्लक्षच केले आहे. जर या रस्त्यावर एखाद्याचा जीव गेला, तर संबंधित अभियंते आणि कंत्राटदारावर सदोष मनुष्यवधाचा गुन्हा दाखल केल्याशिवाय आम्ही थांबणार नाही!"

**गुणाराम बुधरामजी मेहर**
**भाजप शक्तीकेंद्र प्रमुख व उपसरपंच, पिपरिया (ता. सालेकसा)**

# साक्री तालुक्यात कृषी विभागातर्फे शेतकऱ्यांना १००% अनुदान योजनेत भुईमुग बियाण्यांचे वाटप

किशोर सोनवणे
दैनिक स्वराजदूत

-------------------------

राष्ट्रीय अन्न व पोषण सुरक्षा अभियान आणि राष्ट्रीय खाद्यतेल अभियान अंतर्गत खरीप हंगाम २०२५ साठी साक्री तालुक्यातील पात्र शेतकऱ्यांना १००% अनुदानित भुईमुग बियाण्यांचे वितरण करण्यात आले, या उपक्रमामुळे शेतकऱ्यांमध्ये उत्साहाचे व समाधानाचे वातावरण निर्माण झाले, या बियाण्यामध्ये उच्च प्रतीच्या "१८१२" जातीचे भुईमुंग बियाणे वितरित करण्यात आले, या उपक्रमाचे मार्गदर्शन विभागीय कृषी सहसंचालक श्री. सुभाष काटकर यांनी केले असून, आयोजन तालुका कृषी अधिकारी श्री. योगेश सोनवणे यांच्या पुढाकाराने करण्यात आले,



"१८१२" ही उच्च उत्पन्नक्षम व गुणवत्तापूर्ण भुईमुग जाती असून महाडीबीटी पोर्टलवर अर्ज केलेल्या पात्र वैयक्तिक शेतकऱ्यांना वितरित करण्यात आली. बियाण्यांचे वितरण मे. वाय. जी. मोरे सीड्स ॲण्ड पेस्टिसाइड्स, कृषी सेवा केंद्र, साक्री यांच्यामार्फत करण्यात आले, या केंद्राद्वारे साक्री, कासारे, मालपूर, पिंपळनेर, अष्टाने, छडवेल व आजूबाजूच्या गावांतील शेतकऱ्यांना थेट लाभ मिळाला, वितरणप्रसंगी हजर शेतकरी श्री. राहुल नांद्रे आमखेल, श्री. रमेश सीताराम शेवाळे पेरेजपूर, श्री. पानसिंग सुबाजी देसाई वाकी, श्री. हेमंत काशीनाथ देसले गोंदास तसेच, सहाय्यक कृषी अधिकारी श्री. अविनाश कुवर, निखिल शिंदे, ललित आहिरराव यांचीही उपस्थिती होती, या उपक्रमामुळे शेतकऱ्यांना उच्च प्रतीचे बियाणे मोफत उपलब्ध झाले असून, त्यामुळे अन्न व पोषण सुरक्षेत वाढ, उत्पन्नात सुधारणा आणि शेतकऱ्यांची आर्थिक स्थिती बळकट होण्यास मदत होणार आहे, अशी अपेक्षा तालुका कृषी अधिकारी श्री योगेश सोनवणे, कृषी विभाग, साक्री यांनी केली.

# ठाण्यात आनंद दिघेंचा 43 मीटर उंच 'पुतळा उभारणार :- उपमुख्यमंत्री श्री एकनाथ शिंदें

किशोर सोनवणे
दैनिक स्वराज्यदूत

------------------------------

महाराष्ट्राचे उपमुख्यमंत्री तसेच शिवसेना पक्षप्रमुख एकनाथ शिंदे यांनी त्यांचे राजकीय गुरू आणि ठाण्याचे दिवंगत शिवसेना नेते आनंद दिघे यांचा भव्य पुतळा ठाण्यात उभारण्यात असल्याची घोषणा केली, ठाण्यात शिवाजी मैदानाजवळील घड्याळ टॉवरच्या पुनर्रचनेच्या भूमिपूजन सोहळ्यादरम्यान त्यांनी ही महत्त्वपूर्ण घोषणा केली.

सण २०२२ साली शिवसेनेचं नेतृत्व स्वीकारल्यानंतर जवळपास तीन वर्षांनी एकनाथ शिंदेंनी हा महत्त्वपूर्ण निर्णय घेतला आहे, हा पुतळा शिवाजी मैदानात उभा राहणार आणि त्याची उंची ४३ मीटर असणार असे शिंदे यांनी सांगितले, स्वर्गीय आनंद दिघे यांच्या आशीर्वादानेच मी मुख्यमंत्री होऊ शकलो, त्यांच्या स्मृतीला अजरामर करण्यासाठी कोणतीही आर्थिक अडचण येणार नाही व धर्मवीर आनंद दिघे टॉवर हा ठाण्यातील प्रसिद्ध तलाव जवळील छत्रपती शिवाजी महाराज मैदानातच उभारण्यात येणार आहे, या टॉवरमध्ये आनंद दिघे यांचा ४३ मीटर उंच 'किंग-साईज' पुतळा असणार आहे, याचबरोबर शिंदे यांनी जाहीर केले की, "दिघे आणि ठाणे" हे समानार्थी शब्द आहेत त्यांनी ठाणे आणि परिसरात शिवसेनेचा भक्कम बालेकिल्ला उभा करण्यासाठी घेतलेली मेहनत आणि





शहराच्या विकासात दिलेले योगदान विसरता येणार नाही, या स्मारकासाठी ११ कोटी रुपयांचा निधी मंजूर करण्यात आला असून पुतळ्याबरोबरच नागरिकांसाठी विविध सुविधा, सौंदर्यीकरण, आणि स्मृतीस्थळ विकास कामे या साठी ४ कोटी रूपये खर्च करण्यात येणार आहेत,

स्मारक प्रकल्पाचा खर्च

एकूण १५ कोटी रुपये असून, प्रकल्प पूर्ण होण्याचा अंदाजे कालावधी एप्रिल २०२६ पर्यंत असेल, यातील मुख्य सुविधांमध्ये उद्यान, दर्शनी सजावट, बैठक व्यवस्था, माहिती फलक त्याचबरोबर असे असून याच बरोबर ठाणे रेल्वे स्थानक परिसराचे सौंदर्यीकरण प्रकल्पही सुरू करण्यात येणार आहे, शहरातील इतर नागरी प्रकल्पांचाही शुभारंभ या भूमिपूजन सोहळ्यावेळी शिंदे यांच्या हस्ते नुकताच करण्यात आला, शिंदे यांनी ठाणे पश्चिम रेल्वे स्थानकाच्या बाहेरच्या परिसराचे सौंदर्यीकरण प्रकल्पालाही सुरूवात केली यामुळे पादचाऱ्यांची व वाहनांची वाहतूक अधिक सुलभ होणार आहे, या इतर कामामध्ये- रिक्षा व टॅक्सीस्थानकांचे नुतनीकरण, फुटपाथ दुरुस्ती व सुधारणा, माहिती फलक लावणे, झेब्रा क्रॉसिंग आणि लेन मार्किंगची कामे ही कामे होणार आहेत,

हा प्रकल्प डिसेंबर २०२६ पर्यंत पूर्ण होईल, अशी माहिती महापालिका अधिकाऱ्यांनतर्फे देण्यात आली आहे, आनंद दिघे हे १९९० च्या दशकात ठाण्यातील अत्यंत लोकप्रिय आणि प्रभावशाली शिवसेना नेते होते, त्यांना स्थानिक लोक "धर्मवीर" म्हणून ओळखायचे, बाळासाहेब ठाकरे यांचे कट्टर निष्ठावान शिष्य म्हणून त्यांची ओळख होती, ठाण्यात शिवसेनेचा मजबूत बालेकिल्ला त्यांनी उभा केला २००१ साली एका अपघातानंतर त्यांना हृदयविकाराचा झटका आल्याने त्यांचे निधन झाले, त्यांच्या मृत्यूने संपूर्ण ठाणे शहर हादरून गेले होते, दिघेंच्या स्मृती कायमस्वरूपी जपल्या जाव्यात असे शिंदे या दरम्यान बोलत होते, एकनाथ शिंदे हे सुद्धा सुरुवातीला शिवसेनेच्या ठाणे शाखेतील सामान्य कार्यकर्ते होते, त्यांच्या कामाची दखल घेऊन आनंद दिघे यांनी त्यांना संधी दिली आणि मार्गदर्शन केले होते, त्याचबरोबर दिघे यांनी शिंदेंना फक्त राजकीय शिष्य म्हणून नाही, तर एक विश्वासू सहकारी म्हणून घडवले, शिंदे यांच्या या निर्णयामुळे आनंद दिघे यांचे स्मरण नागरिकांच्या मनात अधिक घट्ट होणार आहे, हे स्मारक ठाणेकरांसाठी प्रेरणेचे स्थान ठरेल, असा विश्वास सर्वतोपरी व्यक्त केला जात आहे.

# राष्ट्रीय युवा ग्रामीण पत्रकार संघाच्या शिरुर तालुका अध्यक्षपदी श्री. सुजित मैड यांची निवड

फिरोज सिकलकर
शिरूर प्रतिनिधी
दैनिक स्वराज्यदूत

-----------------------------

ग्रामीण पत्रकारितेत सक्रीय भूमिका बजावणारे आणि सातत्याने सामाजिक प्रश्नांना वाचा फोडणारे श्री. सुजित आबासाहेब मैड यांची "राष्ट्रीय युवा ग्रामीण पत्रकार संघ" शिरूर तालुका अध्यक्षपदी निवड करण्यात आली आहे.

ही निवड संघाचे राष्ट्रीय अध्यक्ष मा. गणेश कचकलवार यांच्या मार्गदर्शनाखाली, महाराष्ट्र प्रदेश उपाध्यक्ष मा. गणेश महाडिक यांच्या उपस्थितीत आणि मा. कांताभाऊ राठोड यांच्या अध्यक्षतेखाली पार पडली.



यावेळी संतोष लांडे (विभागीय अध्यक्ष), सतीश कुमार कोकरे (हवेली तालुका अध्यक्ष), अमित मोरे (हवेली तालुका उपाध्यक्ष), गोपाळ भालेराव, ग्रामीण जिल्हा उपाध्यक्ष संतोष सातकर, पुणे जिल्हा उपाध्यक्ष आदी मान्यवर उपस्थित होते.

नवीन नियुक्तीच्या निमित्ताने श्री. सुजित मैड यांना परिसरातील पत्रकार तसेच सामाजिक कार्यकर्त्यांकडून अभिनंदनाचा वर्षाव होत आहे. पुढील काळात ग्रामीण भागातील पत्रकार बांधवांचे प्रश्न सोडवण्यासाठी आणि त्यांच्या हितासाठी सक्रीय काम करण्याचा निर्धार श्री. सुजित मैड यांनी यावेळी व्यक्त केला.

# हिरापूरमध्ये आदिवासी आश्रमशाळेच्या जमिनीवर बेकायदेशीर कब्जा! शैक्षणिक हक्कांवर घाला – प्रशासन गप्प, अतिक्रमणदार बेधडक!

देवेंद्र दमाहे
गोंदिया जिल्हा प्रतिनिधी
दैनिक स्वराज्यदुत

-------------------

गोरेगाव तालुक्यातील हिरापूर गावात आदिवासी समाजासाठी खरेदी केलेली जमीन आजही उजाड – आणि त्यावर दबंगांनी बेकायदेशीरपणे कब्जा केल्याचा भयंकर प्रकार समोर आला आहे! प्रशासन डोळेझाक करत असताना, आदिवासी समाजात संतापाचा भडका उडालेला आहे.

कोणती जमीन, आणि काय घडतंय तिथं?

एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प, देवरी यांच्यावतीने गट क्र. ७२९ व ७३१ अंतर्गत आदिवासी विद्यार्थ्यांसाठी आश्रमशाळा बांधण्यासाठी ही जमीन पंधरा वर्षांपूर्वी खरेदी करण्यात आली होती.

पण आज, या जमिनीवर गावातील काही प्रभावशाली लोकांची बिनधास्त शेती सुरू आहे. जमीन शासनाची – आणि पीक खासगी? हाच न्याय? अतिक्रमण, धमकी आणि अपमान – आरोप गंभीर गावकरी हिरेश राधेलाल बघेले म्हणतात, "ही जमीन आमच्या आदिवासी मुलांच्या शिक्षणासाठी होती. पण उपसरपंच दिलीप बापचे व त्यांचा भाऊ खुमेंद्र यांनी तिच्यावर थेट शेती चालवली! विरोध केल्यावर धमक्या मिळतात." १२ जून २०२५ रोजी तंटामुक्ती समितीसमोर या वादावर चर्चा झाली. "कोणीही शेती करणार नाही" असा ठराव झाल्यानंतरही तो धुडकावून दिला गेला. निर्णयांचीही चेष्टा? ही आहेत बेकायदेशीर कब्जाधारकांची नावे भूमेश भैयालाल







बिसेन, गुणीलाल पांडुरंग राहागडाले, टेबूलाल सेवकराम चौधरी, मनोज शिशुपाल मेश्राम, उमेश शोभेलाल बिसेन, खुमेंद्र सुखराम बापचे यांच्यावर तत्काळ एफआयआर दाखल करावा, अतिक्रमण हटवावे आणि शैक्षणिक वापरासाठी जमिनीची ताबेदारी बहाल करावी – अशी जोरदार मागणी आहे.

प्रशासन झोपले की दबावात? प्रकल्प अधिकारी उमेश काशीद यांचे निवेदन "तहसीलदार यांना पत्र दिलंय. कारवाई केली जाईल." पण 'पत्र' पुरेसे नाहीत – कृती हवी! असा आदिवासी समाजाचा आक्रोश आहे. कारण आजवर फक्त कागदोपत्री हालचाली – अतिक्रमणदार अजूनही शेतात आहेत!

दुसरी बाजू काय म्हणते? काही आरोपी ग्रामस्थांनी माध्यमांशी बोलताना कबुली दिली की, "जमीन आमची नाही, पण आम्ही ती वर्षानुवर्षे कसतोय." मग जमीन कसताय का, जबरदस्तीने? कायदा काय फक्त कमकुवतांसाठी? आदिवासी समाजाचा इशारा – संघर्ष होणार! " ही आमच्या मुलांच्या भविष्याची जमीन आहे. ती कोणत्याही दबावाखाली गमावणार नाही. कारवाई झाली नाही तर रस्त्यावर उतरू!" – आदिवासी समाज

सामाजिक आणि राजकीय स्फोटक प्रश्न

१. पंधरा वर्षांत प्रकल्पच का नाही?

२. अतिक्रमण काढायला प्रशासन इतकं हतबल का?

३. तंटामुक्ती समितीच्या ठरावावर पाय का?

४. सत्ताधाऱ्यांचा दबाव आहे का?

५. आदिवासी विद्यार्थ्यांचे हक्क गहाळ होत आहेत का?

ही केवळ जमीन नव्हे, ही भविष्याची लढाई आहे! हिरापूरमधील या प्रकरणाने शासनाची निष्क्रियता, स्थानिक राजकीय हस्तक्षेप, आणि आदिवासी समाजावर होणारा अन्याय पुन्हा एकदा उघड केला आहे. या जमिनीवर आश्रमशाळा झाली असती, तर कितीतरी आदिवासी विद्यार्थी शिकले असते. पण सध्या शिक्षणाच्या नावावर शेतं आणि अतिक्रमणच सुरू आहे! आता वेळ आली आहे – या अतिक्रमणाची सखोल चौकशी, दोषींवर कठोर कारवाई, आणि आश्रमशाळेच्या कामाला तातडीने सुरुवात करण्याची! अन्यथा, ही संतापाची लाट संघर्षात बदलल्यास जबाबदार कोण? ही बातमी फक्त आरोपांवर आधारित नसून जमिनीवरून उभ्या होणाऱ्या एका सामाजिक अन्यायाची स्पष्ट वस्तुस्थिती मांडते!

This Daily SWARAJYADOOT is Printed, published and owned by BHASKAR GORAKH DEORE and printed at Jijau graphics and offset printers, near mahabij office, ramkrushna nagar, bhaxi road, Satana, Tal- Baglan, Dist- Nashik, Pin-423301 and published at Head office daily SWARAJYADOOT, flat No. 102, Sumangal heights, Siddhivinayak colony, khande nagar, Nashik, Maharashtra - 422008. Editor Shri. Bhaskar Gorakh Deore

# पत्रकार संरक्षण समिती देगलूरच्या कार्यकारिणीत भर; पदोन्नती व नवीन पदाधिकारी नियुक्ती सोहळा उत्साहात पार

मनोज बिरादार
नांदेड जिल्हा प्रतिनिधी
दैनिक स्वराज्यदुत

---------------------------



पत्रकारांच्या हक्कांसाठी सातत्याने सक्रिय असलेल्या पत्रकार संरक्षण समिती देगलूर तालुकाच्या कार्यकारिणीत नवीन पदाधिकाऱ्यांची भर टाकण्यात आली. आज तालुकाध्यक्ष शेख असलम यांच्या अध्यक्षतेखाली समितीच्या संपर्क कार्यालयात पदोन्नती व नियुक्ती कार्यक्रम उत्साहात पार पडला. या कार्यक्रमात धनाजी जोशी यांना सहकार्याध्यक्ष म्हणून पदोन्नती देण्यात आली. तर श्वेता चिदमलवाड यांची संघटक, प्रभु वंकलवार यांची सहसंघटक, आणि इस्माईल खान यांची सदस्य म्हणून नियुक्ती करण्यात आली. सर्व पदाधिकाऱ्यांचा पुष्पगुच्छ व नियुक्तीपत्र देऊन सत्कार करण्यात आला.

कार्यक्रमाच्या प्रारंभी तालुका सचिव गजानन टेकाळे यांनी प्रास्ताविक करताना सांगितले की, "मागील सहा महिन्यांपासून पत्रकार संरक्षण समितीने अनेक कार्यक्रमांचे आयोजन केले असून, पत्रकारांच्या सन्मानासाठी सतत कार्यरत राहिली आहे. अडचणीत सापडलेल्या पत्रकारांसाठी धावून जाणारी ही संघटना आहे," असे ते म्हणाले. कार्यक्रमात अध्यक्षीय भाषण करताना तालुकाध्यक्ष शेख असलम यांनी सांगितले की, " पत्रकार संरक्षण समिती ही संघटना नसून पत्रकारांचे कुटुंब आहे. कोणत्याही पत्रकारावर अन्याय झाल्यास आम्ही गप्प बसणार नाही. कोणताही गट, पक्ष न पाहता पत्रकारांच्या पाठीशी उभे राहणे हेच आमचे ध्येय आहे." दरम्यान नवीन पदाधिकाऱ्यांनी आपले मनोगत व्यक्त करत, संघटनेच्या कामात जबाबदारीने योगदान देण्याचे आश्वासन दिले. यावेळी कार्याध्यक्ष धनाजी देशमुख, कोषाध्यक्ष तोहिद काझी, सदस्य उबेद हबीब, पत्रकार अनिल पवार, शेख अफान व अन्य पदाधिकारी व पत्रकार उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन संघटनेचे सहकोषाध्यक्ष गजानन शिंदे केले तर आभार प्रदर्शन तालुका सचिव गजानन टेकाळे यांनी केले...

# विश्रांतवाडी येथे रक्तदान शिबिराच्या आयोजन

राज रावणगांवकर
हडपसर प्रतिनिधि
दैनिक स्वराज्यदूत

----------------------



रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया (आठवले) विश्रांतवाडी शाखेच्या वतीने मंदिराचे आयोजन करण्यात आले. अनेक लोकांनी रक्तदान शिबिरामध्ये भाग घेऊन आपले अमुल्य रक्तदान करून एखाद्या गरीब माणसाला उपयोगी पडू शकते हे यातून दाखवून दिले. त्यावेळी उपस्थित अशोक कांबळे राज्य कार्यकारणी सदस्य आरपीआय निलेश आलाट पश्चिम महाराष्ट्र युवक अध्यक्ष प्रभाग क्रमांक एक भगवान शिंदे शिवाजी गायकवाड उपाध्यक्ष पुणे शहर इत्यादी उपस्थित होते.

# माय मराठीसाठी आझाद मैदानातून लढ्याचे रणशिंग फुंकले; हिंदी सक्तीच्या आदेशाची होळी करताच उद्धव ठाकरेंची भीमगर्जना,

शैलेश रौंदळ
नाशिक प्रतिनिधी
दैनिक स्वराज्यदूत

---------------------------



राज्यात पहिलीपासून सक्तीच्या हिंदीकरणाविरोधात आज (29 जून) आझाद मैदानातून रणशिंग फुंकण्यात आले. शिवसेना ठाकरे गटाकडून आझाद मैदानात महायुती सरकारने काढलेल्या हिंदी सक्तीच्या आदेशाची प्रतिकात्मक होळी करण्यात आली. शिवसेना पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांच्या उपस्थितीत प्रतिकात्मक होळी करण्यात आली. यावेळी काँग्रेस प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ, मनसे नेते नितीन सरदेसाई, आमदार आदित्य ठाकरे, शिवसेना खासदार संजय राऊत, खासदार अरविंद सावंत, अनिल देसाई, सुभाष देसाई, संतोष शिंदे, अभिनेता हेमंत ढोमे, काँग्रेस प्रवक्ते युवराज मोहिते सुद्धा उपस्थित होते. यावेळी बोलताना उद्धव ठाकरे यांनी सगळेच गुलाम झाले नसल्याची प्रतिक्रिया दिली. मराठी अभ्यास केंद्र आणि समविचारी संस्था यांच्या वतीनेही सक्तीच्या आदेशाची होळी करण्यात आली. दरम्यान, मोर्चा काढण्याची वेळ येऊ दिली जाणार नाही असा आम्ही या संदर्भात प्रयत्न करत असल्याची प्रतिक्रिया उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी दिली होती. या संदर्भात विचारण्यात आला असता उद्धव ठाकरे म्हणाले की, सगळेच गुलाम झाले नाहीत ही चांगली गोष्ट आहे. मात्र, कोणाचा दुराग्रह आहे हे कोण हे कोणी सांगत नसल्याचे उद्धव ठाकरे म्हणाले. पाच जुलै रोजी होणारा मोर्चा हा महा भव्य मोर्चा असेल असे त्यांनी नमूद केलं. त्यांनी सांगितले की जीआरची होळी केली आहे याचा अर्थ जो लागू आहे असे आम्ही मानत नाही. आझाद मैदानात उद्धव ठाकरेंच्या उपस्थितीतून हिंदी सक्तीच्या जीआरची होळी करण्यात आली त्याच पद्धतीने राज्यभर सुद्धा हिंदी सक्तीच्या शासन आदेशाची प्रतिकात्मक होळी करण्यात आली. यावेळी हिंदीला विरोध नसल्याचे सांगत सक्तीला विरोध असल्याची प्रतिक्रिया आंदोलकांनी दिली. नाशिक , पुण्यासह मुंबईमध्ये सक्तीच्या हिंदीविरोधात आंदोलन करण्यात आले. दुसरीकडे, याला विरोध म्हणून भाजपकडून प्रतीकात्मक आंदोलन करण्यात आले. मुंबईत भाजप आमदार राम कदम यांनी ठाकरेंच्या शिवसेनेविरोधात आंदोलन केले

# दगडीवीहीर गावातील बस सेवा पुन्हा सुरू करा आगार प्रमुखांकडे भाजपार युवा मोर्चा तालुका सरचिटणीस राहुल राठोड यांची मागणी

संजय बच्छाव
धुळे जिल्हा प्रतिनिधी
दैनिक स्वराज्यदूत

---------------



साक्री तालुक्यातील दगडीविहिर येते बस सेवा पुन्हा सुरू करा साक्री आगार प्रमुख कडे भारतीय जनता पार्टी युवा मोर्चा तालुका सरचिटणीस राहुल राठोड यांची मागणी दगडीवीहीर गावातील बस सेवा बंद असल्यामुळे विद्यार्थ्यांना चार किलोमीटर प्रवास करून साक्री येथे शिक्षण घेण्यासाठी यावे लागते बस सेवा बंद असल्यामुळे विद्यार्थ्यांना व सर्व सर्वसामान्यांना खूप मोठा त्रास सहन करून चार किलोमीटर प्रवास करावा लागतो बस सेवा सुरू झाली तर दगडीवीहीर गावातील १२ विद्यार्थ्यांना पायी प्रवास करावा लागणार नाही पायी प्रवास असल्यामुळे त्यांच्या शिक्षणावर ही खूप मोठा परिणाम होत आहे तरीही आगार प्रमुखांना भारतीय जनता पार्टी युवा मोर्चा तालुका सरचिटणीस राहुल राठोड यांनी निवेदन दिले व लवकरात लवकर दगडीवीहीर गावातील बस सेवा चालू करण्यात यावे व विद्यार्थ्यांना होणाऱ्या त्रासाला मुक्त करण्यात यावे व असे निवेदन देण्यात आले .

# शिक्षणमंत्री दादाजी भुसे यांच्या हस्ते आरध्याच्या पुस्तकाचे प्रकाशन, आराध्या भूषण निकम ठरली जगातील सर्वात लहान लेखिका

किशोर सोनवणे
दैनिक स्वराज्यदूत

---------------------------



“बिकमिंग अ स्मार्ट स्टुडट” या आगळ्या वेगळ्या पुस्तकाचे प्रकाशन नुकतेच राज्याचे शालेय शिक्षणमंत्री श्री. दादाजी भुसे यांच्या हस्ते नाशिक येथे संपन्न झाले, आराध्या निकम ही फक्त आठ वर्षाची असून ती ग्लोबल इंटरनॅशनल स्कूल नाशिक येथे इयत्ता चौथी या वर्गात शिकत आहे, हीची जगातील सर्वात लहान लेखिका म्हणून नोंद होणार असून हा एक विश्व विक्रमच आरध्याच्या नावाने होणार आहे, या पुस्तक प्रकाशनाच्या वेळी शिक्षणमंत्री श्री. भुसे म्हणाले, की “ सर्वच विद्यार्थ्यांना शालेय शिक्षण खूप महत्त्वाचे आहे, आज आपण शिकलो तरच पुढे समाजात काहीतरी सकारात्मक योगदान देऊ शकतो, त्यामुळेच शिक्षण खातं माझ्या नशिबात आलं, याचा मला अभिमान आहे” आराध्या निकम हिने इतक्या लहान वयात एवढं मौलिक पुस्तक लिहिल्याबद्दल आराध्याचे श्री भुसे यांनी मनापासून कौतुक केले, आणि हे पुस्तक राज्यातील सर्व विद्यार्थ्यांसाठी उपयुक्त ठरेल, असा विश्वास व्यक्त केला, या प्रकाशन सोहळ्याला शिवसेना नेते आ. सुहास कांदे, सौ. अंजुम कांदे, राज्य शिवसेना सचिव भाऊसाहेब चौधरी, जिल्हाध्यक्ष विजय करंजकर, उपजिल्हा प्रमुख भाऊलाल तांबडे, देवाआबा वाघ आणि आराध्याचे वडील व कृषी उद्योजक, लेखक, मार्गदर्शक मा. भूषण निकम आदी उपस्थित होते.

पुस्तकाची वैशिष्ट्ये: “बिकमिंग अ स्मार्ट स्टुडट” हे पुस्तक मराठी व इंग्रजी भाषेत असून यात विद्यार्थ्यांना शैक्षणिक यशाबरोबर मानसिक, शारीरिक व बौद्धिक विकास कसा साधायचा तसेच योग व आहाराचे महत्त्व, व्यक्तिमत्व विकास, अभ्यासाचे तंत्र, मैदानी खेळ, चांगल्या सवयी, बॅड टच - गुड टच, देशभक्ती आणि सकारात्मक विचार, शिस्तबद्ध दिनचर्या याचे मार्गदर्शन यात दिले आहे, हे पुस्तक नर्सरी ते पोस्ट ग्रॅज्युएट स्तरातील विद्यार्थ्यांसाठी उपयुक्त असून पालक व शिक्षकांनी देखील वाचावे असे मार्गदर्शक पुस्तक आहे, आराध्याने हे पुस्तक तिच्या वडिलांच्या प्रेरणेने लिहिले असून भविष्यात आणखी पुस्तके लिहून एक लाख विद्यार्थ्यांना स्मार्ट बनवण्याचं स्वप्न ती बाळगते, हा प्रकाशन सोहळा विद्यार्थ्यांसाठी अतिशय प्रेरणादायी ठरला संपूर्ण कार्यक्रमात शिक्षण, संस्कार, आणि सकारात्मकता याचे महत्त्व अधोरेखित करण्यात आले, या कार्यक्रमामुळे अनेक विद्यार्थी, शिक्षक आणि पालकांना प्रेरणा मिळाली असून पुस्तकाच्या प्रचार-प्रसाराला देखील मोठी चालना मिळाली आहे.

**आजच्या धकाधकीच्या जीवनात पालकांना मुलांकडे वेळ देणे कठीण झाले आहे, त्यामुळे केवळ अभ्यास नव्हे तर विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास होणे आवश्यक आहे, म्हणूनच हे पुस्तक विद्यार्थ्यांना जीवनात सकारात्मक बदल घडवून आणण्यासाठी निश्चितच उपयुक्त ठरणार आहे.**
**श्री भूषण निकम,**
**बिझनेस कोच व आराध्याचे मार्गदर्शक**

# लासलगावमध्ये अवैध उर्दू शाळा सुरु

शैलेश रौंदळ
नाशिक प्रतिनिधी
दैनिक स्वराज्यदूत

------------------------




शिक्षण विभागाची मान्यता नसताना लासलगाव परिसरात शाळा सुरू असल्याचे उघड झाले. याबाबत गटशिक्षणाधिकाऱ्यांनी लासलगाव पोलीस ठाण्यात तक्रार केल्यावर गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

लासलगांव येथील दि लासलगाव नॅशनल एज्युकेशन सोसायटी संचलित बी. आ. शेख उर्दू प्राथमिक शाळेचे अध्यक्ष आणि संचालकांनी बालकाचा मोफत व सक्तीचा शिक्षणाचा हक्क अधिनियम कायद्यानुसार शिक्षणाधिकारी यांची मान्यता नसतांना तसेच कोणताही युडायस क्रमांक मंजूर नसतांना बेकायदेशीररित्या शाळा सुरु ठेवली.

अनधिकृतपणे शाळा सुरु ठेवत विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान केल्याचा ठपका ठेवण्यात आला. याप्रकरणी शाळेचे अध्यक्ष हारूण शेख यांच्यासह पाच जणांविरुध्द गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

# नाशिकमध्ये ठाकरे गटाला मोठा धक्का

## अखेर विलास शिंदेंचा एकनाथ शिंदेंच्या शिवसेनेत प्रवेश, नाशिकच्या आठ माजी नगरसेवकांनीही हाती घेतला धनुष्यबाण

**शैलेश रौंदळ**
**नाशिक प्रतिनिधी**
**दैनिक स्वराज्यदूत**

--------------------



गेल्या काही दिवसांपासून पक्षावर नाराजी व्यक्त करणारे शिवसेना ठाकरे गटाचे माजी महानगरप्रमुख विलास शिंदे सात ते आठ माजी नगरसेवकांसह उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या उपस्थितीत शिंदेसेनेत प्रवेश केला. रविवारी (दि. 29) सकाळीच ते मोठं शक्ती प्रदर्शन करत मुंबईच्या दिशेने शिंदे रवाना होणार झाले होते.

पक्ष प्रवेशाला जाण्यापूर्वी विलास शिंदे यांनी एबीपी माझाशी बोलताना म्हटले होते की, आजवर माझ्यावर अन्याय झाला आहे. आम्ही निष्ठावान आहोत. मात्र, किती दिवस निष्ठावान राहायचे? आम्ही शिवसेनेतच जातोय. बाळासाहेब ठाकरे यांच्या विचारांच्या शिवसेनेत जात आहोत. आम्ही एकनाथ शिंदे यांच्यावर टीका केली होती. आमच्या समोर तसे चित्र उभे करण्यात आले होते, त्यामुळे आम्ही तसे बोललो होतो. मात्र, जवळ गेल्यावर जाणवते की, माणूस वेगळा आहे. अहोरात्र कार्य ते असतात, असा नेता जगात नाही. माझ्यासारख्या सामान्य शिवसैनिकाच्या घरातल्या लग्नाला शिंदेसाहेब आले होते, त्याचा मला आनंद असल्याची भावना त्यांनी यावेळी व्यक्त केली होती. दरम्यान, आज पक्ष प्रवेशावेळी विलास शिंदे यांच्याकडून एकनाथ शिंदे यांना चांदीची तलवार देखील भेट देण्यात आली. विलास शिंदे यांच्यासह नाशिकमधील सात ते आठ नगरसेवकांनी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या शिवसेनेत प्रवेश केला. यापूर्वी सुधाकर बडगुजर, माजी मंत्री बबन घोलप, माजी महापौर नयना घोलप, माजी महापौर अशोक मुर्तडक यांनी भाजपमध्ये प्रवेश केला आहे. त्यानंतर विलास शिंदे यांच्यासह नाशिकमधील माजी नगरसेवकांनी शिंदेंच्या शिवसेनेत प्रवेश केल्याने नाशिकमध्ये शिवसेना ठाकरे गटाला मोठं खिंडार पडलं आहे. दरम्यान, विलास शिंदे यांच्या शिंदे गटाच्या पक्ष प्रवेशावर ठाकरे गटाचे खासदार संजय राऊत यांनी प्रतिक्रिया दिली होती. कोण विलास शिंदे मी ओळखत नाही, असे संजय राऊत यांनी म्हटले होते. संजय राऊत यांच्या वक्तव्यावर शिंदे गटाचे नेते अजय बोरस्ते यांनी जोरदार पलटवार केला. संजय राऊत यांना स्मृतिभ्रंश झाला असेल. विलास शिंदे पाच वर्षे गटनेता, महानगरप्रमुख होते, अशा व्यक्तींची ओळख नाही. मग फक्त तुम्हाला राहुल गांधींची ओळख आहे का? स्व. हिंदुहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे सांगायचे की, शिवसैनिक हीच शिवसेनेची ताकद आहे. त्याच शिवसैनिकांना तुम्ही आता ओळखत नाहीत. संजय राऊत यांनी आत्मपरीक्षण केलं पाहिजे. सुधाकर बडगुजर त्यांचा उजवा हात, भाऊ चौधरी डावा हात होते, दोन्ही नेते त्यांना सोडून गेले. शिवसैनिकांना ओळखत नसाल तर ते शिवसेनेत कसे राहतील? एक दिवस असं म्हणण्याची वेळ येईल की, संजय राऊत कोण? असे म्हणत अजय बोरस्ते यांनी खासदार संजय राऊत यांच्यावर निशाणा साधला होता.